# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.10.2025** **वारःशुक्रवार**

1. 17 व्या रोजगार मेळाव्यात पंतप्रधान आज 51 हजार उमेदवारांना नियुक्तीपत्रं वितरित करणार
2. गगनयान हे भारताचं मानवरहित अंतराळयान डिसेंबर महिन्यात प्रक्षेपणासाठी सज्ज होणार असल्याची इस्त्रोची माहिती
3. ऑपरेशन सिंदूर हे भारताच्या इच्छाशक्तीचं आणि क्षमतेचं प्रतीक असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचं प्रतिपादन आणि
4. आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेटमध्ये भारतीय संघ उपांत्य फेरीत दाखल, तर पुरुषांच्या क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाची मालिकेत विजयी आघाडी

**पंतप्रधान -रोजगार-मेळा**

देशव्यापी रोजगार मेळ्याच्या 17 व्या टप्प्यामध्ये आज पंतप्रधान नरेंद्र मोदी 51 हजारांहून अधिक उमेदवारांना नियुक्ती पत्रांचं वाटप करणार आहेत. या कार्यक्रमात पंतप्रधान नवनियुक्त उमेदवारांना संबोधितही करणार आहेत. देशभरातील 40 ठिकाणी हा कार्यक्रम होणार आहे. याअंतर्गत मुंबईत केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थितीत, तर पुण्यात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत उमेदवारांना नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात येणार आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन चेन्नईमध्ये उमेदवारांना नियुक्ती पत्रांचं वाटप करतील, तर आयुष आणि आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव मदुराईमध्ये आणि अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी तिरुचिरापल्लीमध्ये उमेदवारांना नियुक्ती पत्रांचं वाटप करणार आहेत.

**पंतप्रधान-बिहार**

देश वेगानं विकास करत असून या प्रवासात खांद्याला खांदा लावून बिहार पुढं जात आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. 'मेरा बूथ सबसे मजबूत' कार्यक्रमांतर्गत काल संध्याकाळी त्यांनी भाजप-एनडीएच्या कार्यकर्त्यांशी दूरस्थ पद्धतीनं संवाद साधला. केंद्र आणि बिहारमध्ये स्थिर सरकार असल्यानं देशात आणि बिहारमध्ये विकास कामे सुरू असल्याचा उल्लेख करून जेव्हा स्थिरता असते तेव्हा विकासाला गती मिळते, असं त्यांनी सांगितलं.

**गगनयान**

भारताच्या गगनयान या मानवरहित अंतराळयानाच्या निर्मितीचं 90 टक्के काम पूर्ण झालं असून डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात ते चाचणी उड्डाणासाठी सज्ज आहे. इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही नारायणन यांनी काल बंगळुरूमध्ये पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या उड्डाणात व्योममित्र हा यंत्रमानव यानातून पाठवला जाईल. 2027 मध्ये गगनयानचं पूर्ण उड्डाण होणार असून त्यावेळी 3 भारतीय अंतराळवीर त्यातून प्रवास करुन परत पृथ्वीवर येतील, असं त्यांनी सांगितलं.

**राजनाथ-कॉन्फरन्स**

ऑपरेशन सिंदूर हे भारताच्या इच्छाशक्ती आणि क्षमतेचं प्रतीक होतं आणि याद्वारे प्रत्येक आव्हानाला उत्तर देण्यासाठी भारत नेहमीच तयार असल्याचा जगाला संदेश देण्यात आल्याचं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. नवी दिल्ली इथं काल नौदल कमांडर्स कॉन्फरन्सला संबोधित करताना ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानी सैन्याला किनाऱ्याजवळ त्यांच्या बंदरात राहण्यास भाग पाडल्याबद्दल संरक्षण मंत्र्यांनी भारतीय नौदलाचं कौतुक केलं. या मोहिमेदरम्यान

नौदलाची तयारी, व्यावसायिक क्षमता आणि ताकद जगानं पाहिल्याचं त्यांनी म्हंटलं. हिंद महासागर क्षेत्रात भारतीय नौदलाची उपस्थिती मित्र राष्ट्रांसाठी दिलासा देणारी आणि प्रदेश अस्थिर करू पाहणाऱ्यांसाठी अस्वस्थतेची बाब असल्याचंही ते म्हणाले.

**<u>संरक्षण-खरेदी</u>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषदेच्या बैठकीत काल सशस्त्र दलांच्या क्षमता वाढविण्यासाठी सुमारे एकोणनव्वद हजार कोटी रुपयांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. लष्करासाठी नाग क्षेपणास्त्र प्रणाली, जमिनीवर आधारित मोबाइल E-LINT प्रणाली आणि मटेरियल हँडलिंग क्रेनसह हाय-स्पीड वाहनांच्या खरेदीचा यात समावेश असल्याचं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं.

**<u>अश्विनी वैष्णव</u>**

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीतील रेल भवन इथल्या वॉर रूममधून उत्सवाच्या काळात प्रवाशांच्या सोयीसाठी धावणाऱ्या विशेष गाड्यांच्या स्थितीचा काल छठ पूजेपूर्वी आढावा घेतला. रेल्वे स्थानकांवरील उत्सवाच्या गर्दीचं निरीक्षण आणि व्यवस्थापन करण्यासाठी वॉर रूमची स्थापना करण्यात आली आहे. देशभरात तीन स्तरीय वॉर रूम असून याव्यतिरिक्त, प्रत्येक प्रमुख स्थानकावर एक मिनी कंट्रोल रूम स्थापन करण्यात आला असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>जीएसटी</u>**

केंद्र सरकारनं अनेक क्षेत्रांमध्ये जीएसटी दर कमी केल्याचा लाभ देशभरातील नागरिकांना झाला आहे. कृषी क्षेत्रातील कर कपातीमुळं शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. विविध कृषी उपकरणांवरील कर 12 टक्क्यांवरून 5 टक्के करण्यात आला असल्यामुळं शेतकऱ्यांना किफायतशीर दरात ही उपकरणे खरेदी करता येऊ लागली आहेत. जैव-कीटकनाशकांना 5 टक्के जीएसटी टप्प्यामध्ये ठेवण्यात आल्यामुळं जैविक शेतीला प्रोत्साहन मिळत असून खत उत्पादनात वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालावरील जीएसटी देखील 5 टक्क्यांवर आल्यामुळं उत्पादन खर्च आणखी कमी झाला आहे.

**<u>स्मार्ट-मीटर</u>**

देशभरात 10 कोटी स्मार्ट वीज मीटर बसवण्याचं उद्दिष्ट असून त्यापैकी 1 कोटी आधीच बसवण्यात आले असल्याचं केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल यांनी म्हंटलं आहे. ते हरियाणातील रोहतक शहरात माध्यमांशी संवाद साधत होते. स्मार्ट मीटर बसवल्यानं ग्राहकांच्या तक्रारी दूर होतील, तसंच ग्राहकांना त्यांचा वीज वापर नियंत्रित करता येऊन वीज वाचवता येईल, असं ते म्हणाले. मेट्रो विस्ताराबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री म्हणाले की, देशात आतापर्यंत अकराशे किलोमीटर मेट्रो रेल्वे लाईन्स बांधण्यात आल्या असून मेट्रो रेल्वेच्या बाबतीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावरून लवकरच दुसऱ्या क्रमांकावर पोहोचेल. सध्या 24 शहरांमध्ये मेट्रो सेवा उपलब्ध असून भविष्यात ही सुविधा 29 शहरांमध्ये उपलब्ध होईल, असं ते पुढं म्हणाले.

**<u>RBI</u>**

भारतातील डिजिटल पेमेंट लँडस्केपचा झपाट्यानं विस्तार सुरू असून या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत डिजिटल व्यवहारांचा वाटा एकंदर पेमेंट व्यवहारांच्या 99 पूर्णांक 8 दशांश टक्के आणि एकूण मूल्याच्या 97 पूर्णांक 7 दशांश टक्के आहे, असं आरबीआय अर्थात रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या एका अहवालात म्हटलं आहे. यूपीआय हा प्रमुख पेमेंट प्लॅटफॉर्म असल्याचं दिसून आलं असून त्याचा वाटा एकंदर व्यवहारांच्या प्रमाणात 85 टक्के आणि मूल्याच्या 9 टक्के असल्याचं आरबीआयच्या या वर्षाच्या पहिल्या सहामाही पेमेंट सिस्टम्स अहवालात दिसून आलं आहे. या कालावधीत यूपीआयद्वारा 143 लाख 30 हजार कोटी रुपयांचे 10 हजार 600 कोटींहून अधिक व्यवहार करण्यात आले.

**<u>बँकनियम</u>**

बँक खात्यांसाठी वारसदारांची नोंदणी करण्याची प्रक्रिया एक नोव्हेंबरपासून आणखी सुलभ होणार आहे. यात 4 व्यक्तींची वारसदार म्हणून नोंदणी करता येईल. त्यामुळं ठेवीदार आणि त्यांच्या वारसांचे दावे निकाली काढणं सोपं होणार आहे.

बँकिंग कायद्यातल्या या संदर्भातल्या सुधारणांची अंमलबजावणी पुढच्या शनिवारपासून सुरू होणार असल्याचं केंद्रीय अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

**भाऊबीज**

दिपावलीच्या पर्वातील भाऊबीजेचा सण काल देशासह संपूर्ण राज्यभरातही पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. बहीण-भावाच्या अतूट स्नेहाचं प्रतीक असलेल्या या सणानिमित्त बहिणींनी आपल्या भावांचं औक्षण करुन त्यांच्या दीर्घायुष्याची कामना केली तर भावांनी त्यांच्या निरंतर संरक्षणाचं वचन देत त्यांना विविध भेटवस्तू प्रदान केल्या.

**अपघात**

आंध्र प्रदेशातील कुर्नूल इथं एका खाजगी बसला आग लागल्यामुळे झालेल्या दुर्घटनेत 25 जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. हैदराबादहून बेंगळुरूला जाणाऱ्या या बसला आज पहाटे कुर्नूल जिल्ह्यातील चिन्ना टेकुरुच्या उलिंदाकोंडा जवळील उपनगरात आग लागली. दुर्घटनेच्या वेळी सुमारे 42 जण बसमध्ये होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. समाज माध्यमावरील पोस्टमध्ये राष्ट्रपतींनी शोकग्रस्त कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त केली असून जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी प्रार्थना केली आहे.

**महिला-क्रिकेट**

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल रात्री नवी मुंबईत झालेल्या सामन्यात न्यूझीलंडचा 53 धावांनी पराभव करून भारतानं उपांत्य फेरीत प्रवेश केला. प्रथम फलंदाजी करताना, भारतीय सलामीवीर प्रतीका रावल आणि स्मृती मानधना यांनी शानदार शतकं ठोकत 49 षटकांत 3 बाद 340 धावांपर्यंत मजल मारली. मानधनानं 109 तर रावलनं 122 धावा केल्या. या दोघींनी महिला विश्वचषकाच्या इतिहासात भारतासाठी सर्वाधिक 212 धावांची विक्रमी सलामी भागीदारी केली.

पावसामुळं न्यूझीलंडसाठी डाव 44 षटकांचा करण्यात आला. त्यामुळं सुधारित325 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, न्यूझीलंडनं 44 षटकांत 8 बाद 271 धावा केल्या, यामध्ये ब्रुक हॅलिडेने सर्वाधिक 81 धावा केल्या. या विजयासह, भारतीय महिला संघाचे आता तीन विजयांमधून सहा गुण झाले आहेत आणि ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेच्या बरोबरीनं त्या उपांत्य फेरीत पोहोचल्या आहेत.

**पुरुष-क्रिकेट**

ऑस्ट्रेलियात सुरु असलेल्या पन्नास षटकांच्या क्रिकेट मालिकेत काल यजमान संघानं भारताविरुद्ध दुसरा सामना दोन गडी राखून जिंकला आणि मालिकेत विजयी आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी करताना भारताच्या 9 बाद 264 धावा झाल्या. ऑस्ट्रेलियानं सत्तेचाळीसाव्या षटकात हे लक्ष्य पूर्ण केलं.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**